Rotary Club of Beed Midtown
# MIRROR
UNITE FOR GOOD Rotary
अंक-२ Club No. 27961 RI Year 2025-26 सोमवार दि.२५ ऑगस्ट २०२५

## रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचा २०२५-२६ या वर्षाचा 'दिमाखदार' पदग्रहण समारंभ संपन्न




रो.इंजि.नितीन गोपन व रो.डॉ.निलेश जगदाळे यांच्याकडून अध्यक्ष व सचिव चा पदभार स्विकारत असताना रो.इंजि.राहुल बोरा, रो.डॉ.प्रकाश कोंका व्यासपीठावर पीडीजी रो.डॉ.उल्हास कोल्हटकर, वक्फ बोर्ड अध्यक्ष ना.रो.समीर काझी, पीडीजी रो.हरिष मोटवाणी, ए.जी.रो.कल्याण कुलकर्णी, रो.सीए.आदेश नहार तसेच पदग्रहण समारंभात बहुसंख्येने रोटरीयन, ॲन्स, ॲनेट्स व समाजातील प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते.




(बीड वार्ता):- रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचा ३५ वा पदग्रहण समारंभ दि. ७ जुलै २०२५ रोजी सायं. ७ वा. हॉटेल निलकमल बीड येथे अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला. यावेळी रो.इंजि. राहुल बोरा यांनी नवीन अध्यक्ष म्हणून सुत्रे स्विकारली तर रो.डॉ. प्रकाश कोंका यांची सचिवपदी निवड झाली. नव्याने नियुक्त संचालक मंडळासह नवीन सदस्यांचे औपचारिक स्वागत आणि शपथविधी यावेळी पार पडले. व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून पीडीजी रो.डॉ.उल्हास कोल्हटकर उपस्थित होते. यावेळी त्यांनी रोटरी समाजामध्ये कशाप्रकारे सामाजिक क्षेत्रामध्ये काम करत आहे याचे विविध पैलू व उदाहरणे दिली. विशेष करून लग्नसोहळा जसा असतो त्या प्रकारचा पति आणि पत्नीचा अध्यक्ष आणि सचिवाचा संसार असतो. संसारातील विविध रंजक गोष्टी कशा घडतात आणि त्या अध्यक्ष सचिव यांना कशा भूमिका पार पाडाव्या लागतात या त्यांनी अतिशय खेळीमेळीच्या-हर्षोल्हासाच्या वातावरणामध्ये सर्व रोटरीयन व मान्यवरांना संबोधित केले. आभार प्रदर्शन रो.डॉ. प्रकाश कोंका यांनी केले.




RI President :
Rtn. Francessco Arezzo



District Governor :
Rtn. Sudhir Lature



Assitant Governor :
Rtn. Kalyan Kulkarni



President
Rtn.Er. Rahul Bora



Secretary
Rtn.Dr. Prakash Konka



Editor :
Rtn.Balaji Gharat


## स्वातंत्र्यदिनानिमित्त श्रीहरी विद्यालय वाहेगाव (आमला) येथे रोटरीचे ध्वजारोहन व शाळेला १० सिमेंट बेंचेस वाटप




(बीड वार्ता):- रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन तर्फे श्रीहरी विद्यालय वाहेगाव (आमला) हॅपी स्कुल अंतर्गत १० सिमेंट बेंचेस वाटप करण्यात आले. प्रो.चे. रो. सुरेश बुद्धदेव, रो. संजय गुप्ता तर मुख्याध्यापक श्री के.डी.राऊत, अध्यक्ष रो.इंजि. राहुल बोरा, सचिव रो.डॉ.प्रकाश कोंका व समस्त ग्रामस्थ उपस्थित होते.





(बीड वार्ता):- रो.संजय सरोदे यांनी बीड ते लेह (लदाख) तेही एकटे सोलोराईड पूर्ण केली आहे. त्याबद्दल रोटरी परिवारातर्फे अभिनंदन..!




Rotary
Club of Beed Midtown
MIRROR
UNITE FOR GOOD
Club No. 27961 RI Year 2025-26

## उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या उपस्थितीमध्ये हरित बीड अभियानांतर्गत ३० लाखाहून अधिक वृक्षांची लागवडीमध्ये रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचा सहभाग

### ‘३० लाख वृक्षारोपणाची इंडियन बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद’



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार, जिल्हाधिकारी साहेब, पोलीस अधिक्षक साहेब, रोटरी क्लब बीड मिडटाऊनचे अध्यक्ष रो. इंजि. राहुल बोरा, सचिव रो. डॉ. प्रकाश कोंका व समस्त रोटरीयन वृक्षारोपन मोहिमेत सहभागी होत असताना.



हरित बीड अभियान वृक्षारोपनात सहभागी होत असताना रो. सुरेंद्र कासट, रो.संजय गुप्ता, रो.डॉ.शिवाजी देशमाने, रो.भारत बेद्रे, रो.बद्रीनारायण मानधने, रो.दत्ता शहाणे, रो.अमोल तळेकर, रो.भगिरथ चरखा, रो.विशाखा ढोले, रो.डॉ.सिताराम आळणे, रो.इंजि. संतोष सानप व समस्त रोटरीयननी सहभाग घेऊन प्रोजेक्ट यशस्वी केला.

हवामान बदल, वाढते प्रदुषण, पाण्याची टंचाई यामुळे वृक्ष लागवड ही काळाची गरज झाली आहे. बीड जिल्ह्याने एकाच दिवशी ३० लाखाहून अधिक वृक्षांची लागवड करून विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी हरित बीड जिल्हा अभियानात सहभागींचे कौतुक केले. या रोपांचे संवर्धन, संगोपनाची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. जिल्हा प्रशासनाने वर्षभरात १ कोटी रोपांची लागवड करण्याचा संकल्प केला आहे. या मोहिमेत रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन व सर्व मेंबर सहभागी होऊन हा प्रोजेक्ट यशस्वी केला. एकाच दिवशी ३० लाखाहून अधिक वृक्षांची लागवड केल्यामुळे इंडियन बुक ऑफ रेकॉर्डमध्ये या वृक्षारोपणाची नोंद घेण्यात आली.

## रोटरी क्लब तर्फे ३०० विद्यार्थ्यांना पर्यावरणपुरक शाडूच्या मातीचे गणपती मूर्ती प्रशिक्षण शिबीर संपन्न




यशवंत विद्यालयातील कार्यशाळेत शाडूच्या मातीचे पर्यावरणपुरक ३०० गणपती मूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण देत असताना सुहास पालीमकर सर व सोमनाथ कागदे सर



प्रशिक्षणानंतर यशवंत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट शाडूचे गणपती बनवले. यानंतर सर्व विद्यार्थ्यांना रोटरीतर्फे प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद आणि रोटरीचे अध्यक्ष रो.इंजि. राहुल बोरा, सचिव रो.डॉ. प्रकाश कोंका आणि सर्व रोटरी मेंबर बहुसंख्येने उपस्थित होते.

दै. दिव्य मराठी व रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंत विद्यालयामध्ये शनिवारी पर्यावरण पुरक शाडू मातीच्या गणपती कार्यशाळेला प्रतिसाद मिळाला. ३०० विद्यार्थ्यांनी आपल्या हातांनी गणपती साकारले. या गणपतीची स्थापना आता हे विद्यार्थी आपल्या घरी करणार आहेत. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळावा यासाठी प्रयत्न करण्यात आले. तसेच या गणपतीचे विसर्जन स्वत:च्या घरात करून पर्यावरणाचे संरक्षण करण्यात येणार आहे. रोटरी क्लब व दिव्य मराठी या पर्यावरण पुरक अभियानाला कायम ठेवून बीड जिल्ह्यात पर्यावरण पुरक गणेश उत्सव साजरा व्हावा यासाठी प्रयत्न करणार आहे. यामध्ये रोटरीचे अध्यक्ष रो.इंजि. राहुल बोरा, सचिव रो.डॉ. प्रकाश कोंका व समस्त रोटरी मेंबर व ॲनेटस् सहभागी झाले होते. या पर्यावरण पुरक शाडूच्या गणेश मूर्तीचे अनुकरण विविध शाळेमध्ये, महाविद्यालयामध्ये व सामाजिक संस्थेने आदर्श घेऊन अशा प्रकारची मूर्ती बनवण्याचा संकल्प केला आहे.

रोटरी डिस्ट्रीक्ट ३१३२ तर्फे आयोजित मेंबर ब्रिक्स डिस्ट्रीक्ट मेंबरशिप सेमिनार यामध्ये रोटरीचे अध्यक्ष, सचिव तसेच रोटरी मेंबर व नवीन सदस्य सहभागी होऊन रोटरीच्या विविध नियमावलीचा व ज्ञानाचा अभ्यास करून परिपक्व होत



असताना तसेच या सेमिनारमध्ये मेंबरशिप ग्रोथ केल्याबद्दल डिस्ट्रीक्ट तर्फे सन्मान करण्यात आला. जुने मेंबर व नवीन मेंबर सोबत सेमिनारला सहभागी झाल्याबद्दल रोटरीयनमध्ये मैत्री अजुन परिपक्व झाली.







Raj Beldar Const. & Developer's
Raj Ratan Builders & Construction
9226772288, 8087877087, 9156882277
Office : Kazi Nagar, Jalna Road, Beed.
आमच्याकडे दर्जेदार, उत्तम क्वॉलिटीचे विथ मटेरियल घराचे, कमर्शिअल कॉम्प्लेक्स व बांधकामासंदर्भात सर्व कामे केली जातील. मराठवाड्यातील एक विश्वसनिय कन्स्ट्रक्शन कंपनी

# रोटरी क्लबच्या वतीने मोफत बाल हृदयरोग तपासणी शिबीर संपन्न

## पुण्यात २० बालकांवर होणार मोफत शस्त्रक्रिया



बाल हृदयरोग तपासणी शिबीरामध्ये डॉ. पंकज सुगावकर यांनी बालरुग्णांची तपासणी केली. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, डॉ. उल्हास गंडाळ (जिल्हा आरोग्य अधिकारी), डॉ. सचिन शेकडे (निवासी वैद्यकीय अधिकारी), डॉ. लक्ष्मीकांत तांदळे (डीइआयसीसी), बालरोग तज्ञ डॉ. अशोक भांगे, डॉ. सायली वानेडकर यांचे मार्गदर्शन लाभले. या प्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष रो.इंजि. राहुल बोरा, सचिव रो.डॉ. प्रकाश कोंका, अवेन्यु डायरेक्टर रो. उमाकांत थोरात, प्रोजेक्ट चेअरमन ॲड. नामदेव साबळे तसेच बहुसंख्येने बालक आणि पालक उपस्थित होते.

(बीड वार्ता):- रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन व जिल्हा रुग्णालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत बाल हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय बाल सुरक्षा कार्यक्रम डीइआयसी अंतर्गत, सह्याद्री हॉस्पिटल पुणे यांच्या सहकार्याने जिल्हा रुग्णालय बीड येथे शिबीर पार पडले. या शिबीरात एकूण ६९ बालकांची टूडी इसीएचओ कलर डॉप्लर तपासणी करण्यात आली असून त्यापैकी २० बालकांना शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याचे निदान झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी सह्याद्री हॉस्पिटल पुणे येथे पाठवण्यात आले आहे. जेथे त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. याबद्दल पालकांनी मोफत शस्त्रक्रिया होणार आहे त्यामुळे रोटरी क्लब व जिल्हा रुग्णालय यांचे धन्यवाद व्यक्त केले व असे उपक्रम सदैव राबवावेत अशी भावना सामान्य जनतेतून व्यक्त होत आहे.

# रोटरी कृषीभूषण पुरस्कार प्रविण येवले आणि विनायक परजणे यांना प्रदान




(बीड वार्ता):- कृषी क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल प्रगतीशिल शेतकरी प्रविण येवले व विनायक परजणे यांना कृषीभूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

# जागतिक पशू संक्रमित आजार जनजागृती दिनानिमित्त रोटरी क्लबतर्फे ५६ डॉग १८ कॅटचे मोफत रेबीज लसीकरण



शिबीराचे उद्घाटन जिल्हा पशू संवर्धन उपायुक्त डॉ. आर.बी. कदम, रोटरी क्लबचे अध्यक्ष रो.इंजि.राहुल बोरा, सचिव रो.डॉ.प्रकाश कोंका, सहाय्यक आयुक्त डी.बी.मोरे, सेवानिवृत्त सहाय्यक आयुक्त सर्वोत्तम रणजकर, प्रो.चे. व स्नेहम पशुवैद्यकिय चिकित्सालयाचे रो.डॉ. शिवाजी देशमाने, डॉ.प्रदीप आघाव, सुत्रसंचालन रो.इंजि. नितीन गोपन यांनी केले.



पाळीव प्राण्यांचे मोफत रेबीज लसीकरण करत असताना रो.डॉ. शिवाजी देशमाने व आपल्या पाळीव प्राण्यांचे लसीकरण करुन घेत असताना प्राणीमित्र.

(बीड वार्ता):- जागतिक पशू संक्रमित आजार जनजागृती दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन आणि बीड जिल्हा पशु संवर्धन विभाग व स्नेहम पशु चिकित्सालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिबीरात ७४ पाळीव प्राण्यांचे मोफत रेबीज प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले. यामध्ये ५६ कुत्रे व १८ मांजरी यांना रेबीज प्रतिबंधक लस देण्यात आली. जेणेकरून येणाऱ्या काळामध्ये समाजातील नागरिकांवर या प्राण्यांचा कोणताही दुष्परिणाम होणार नाही. यावेळी सर्व रोटरी मेंबर व प्राणी प्रेमी नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# रोटरीमध्ये सदस्य संख्या वाढवल्याबद्दल रो.राहुल कुलकर्णी यांचा डिस्ट्रीक्टच्या वतीने प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला




आपल्या घराच्या उत्कृष्ट बांधकामासाठी निर्मिती असोसिएटची निवड म्हणजे निर्मल, आनंदी वास्तुची निर्मिती

NIRMITI ASSOCIATES
A VISION TO YOUR DREAMS

✻ आमच्या सुविधा ✻

✻ सर्व प्रकारचे बिल्डींग प्लॅन
✻ एलिव्हेशन प्लॅन
✻ इंटेरिअर डिझाईन
✻ बांधकाम परवाना
✻ अंदाजपत्रक (Estimate)
✻ मूल्यांकन (Valuation)
✻ गुंठेवारी
✻ साहित्यासह बांधकाम (Turn-Key-Projects)

ऑफिस : राजीव गांधी चौक, भक्ती कन्स्ट्रक्शन रोड, बीड

Nirmiti Associates मो. 8007987258, 8657000070



# रोटरी क्लबतर्फे स्वातंत्र्यदिनी सिमेवरील सैनिकांना स्मरुन रक्तदान शिबीर संपन्न




(बीड वार्ता):- स्वातंत्र्य दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी युवा जैन कॉन्फरन्स न्यु दिल्ली अंतर्गत चतुर्थ झोन महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने सिमेवर कार्यरत सैनिकांसाठी १५ ऑगस्ट रोजी एक भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरामध्ये समाजातील विविध घटकांनी सहभाग नोंदवून नऊ रक्तदात्यांनी रक्तदान करून स्वातंत्र्यसैनिकांना विनम्र अभिवादन केले. यावेळी जैन समाजातील प्रतिष्ठित नागरिक व व्यापारी उपस्थित होते. तसेच रोटरीचे अध्यक्ष रो. इंजि. राहुल बोरा, सचिव रो.डॉ. प्रकाश कोंका, प्रो.चे. उमाकांत थोरात व सर्व रोटरी मेंबर बहुसंख्येने उपस्थित होते. हा रक्तदानाचा उपक्रम वर्षभर सतत चालू राहणार आहे असा संकल्प सर्वांनी एकजुटीने जाहीर केला.




(बीड वार्ता):- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ढेकणमोह याठिकाणी रो.उषा ढेरे यांनी वृक्षाला राखी बांधुन एक अनोखा रक्षाबंधन कार्यक्रम साजरा केला व विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणाची जबाबदारी देण्यात आली. या उपक्रमाबद्दल समाजस्तरातून कौतुक होत आहे.



(बीड वार्ता):- बीड जिल्हा योग असोसिएशन यांच्या वतीने ३/८/२०२५ रोजी बीड येथे घेण्यात आलेल्या बीड जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत योगशिक्षक श्री बाबासाहेब कुडके यांचा ४५ वर्षापुढील पुरुष खुल्या गटात बीड जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक आला असून महाराष्ट्र राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे त्याबद्दल रोटरी परिवारातर्फे अभिनंदन!

# रोटरी सार ओरिएन्टेशन प्रोग्रॅम नवीन मेंबरसाठी संपन्न



(बीड वार्ता):- रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन व रोटरी क्लब ऑफ बीड यांच्या संयुक्त विद्यमाने रोटरी सार ओरिएन्टेशन प्रोग्रॅममध्ये रोटरीबद्दलची बायोलॉज रोटरीच्या मिटींग, फाऊंडेशन, एजी, डीजी, पीडीजी, मिटींगचे नियम अशा विविध रोटरीतील माहितीबाबत प्रश्नोत्तराच्या संकल्पनेने रोटरी सार संपन्न झाला. यावेळी अध्यक्ष रो.इंजि.राहुल बोरा, सचिव रो.डॉ. प्रकाश कोंका, अध्यक्ष रो.विकास उमापूरकर, सचिव रो.सुमित जैस्वाल, कोऑर्डीनेटर सीए.रो.आदेश नहार, रो.सुनिल जोशी यांनी जबाबदारी पूर्ण केली.

## रोटरी क्लबतर्फे सर्व ॲनेटस्ना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

पायल राजकुमार कुकडेजा-५ ऑगस्ट
चि.अवीर अक्षय घोडके- ६ ऑगस्ट
कु.प्रेरणा ढोले- ६ ऑगस्ट
चि.करण महाजन- ७ ऑगस्ट
कु.आरोही सानप- ८ ऑगस्ट
कु.ऋग्वेदा कुलकर्णी- १० ऑगस्ट
कु.अनुषा जैन- १० ऑगस्ट
चि.शेख कैफ राज रब्बानी- १४ ऑ.
चि.रामराजे सवासे- २३ ऑगस्ट
श्रीमती राधिका सेठी- २४ ऑगस्ट
हुमा फिरदोस कलीम जहांगीर- २८
कु.निर्मिती घरत- २८ ऑगस्ट
कु.निर्मिका घरत- २८ ऑगस्ट

## रोटरी क्लबतर्फे सर्व ॲन्स यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

सौ.कविता आघाव- १ ऑगस्ट
सौ.सुनिता करवा- २ ऑगस्ट
सौ.वंदना पारख- १४ ऑगस्ट
सौ.सपना करमाळकर- २० ऑगस्ट
सौ.मयुरी थिगळे- २३ ऑगस्ट
सौ.चित्रलेखा येवले- २५ ऑगस्ट

## रोटरी क्लबतर्फे सर्व रोटरीयन व ॲन्स यांना लग्न वाढदिवसाच्या शुभेच्छा!

रो. सर्वज्ञ जोशी- ४ जुलै
रो. मिलींद करकाळकर- ६ जुलै
रो. मनोज थिगळे- ७ जुलै
रो. सय्यद फारुख- १७ जुलै



रो.गणेश सोमाणी यांचे वडील श्री किसनलालजी सोमाणी यांना रोटरीतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

## नवीन मेंबरर्सचे रोटरी परिवारात हार्दिक स्वागत..!

रो.डॉ. सुधीर येवले
रो. पुनम नहार
रो. हरिष अग्रवाल
रो. सतीराम ढोले
रो. विशाल तोष्णीवाल
रो. राम शेळके
रो. अनिल नारखे
रो. सुधर इंगळे

**ऑनररी मेंबर**

रो. हरिष धार्मिक
रो.डॉ. हनुमंत पारखे

## रोटरी क्लबतर्फे सर्व मेंबर्सना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

रो.आदेश नहार- ६ ऑगस्ट
रो.कलिम जहांगीर-१० ऑगस्ट
रो.अभिजीतसिंह ठाकुर- २२ ऑ.
रो.सुरेंद्र बजाज- २२ ऑगस्ट
रो.महेश बुद्धदेव- २४ ऑगस्ट
रो.शैलेजा चिलवंत- २८ ऑगस्ट


स्टॉकिस्ट ॲन्ड डिलर्स
*कारपेट *मॅटींग
*फोम *कुशन *क्वायर
*रेडीमेड पडदे
*रेक्झीन *बेड शिट्स
*गादी *वेलवेट
*फर्निशिंग *वॉलपेपर

सजावट
25

गृह सजावटीचे भव्य दालन
मुनोत कॉम्प्लेक्स, पुना गाडगीळच्या खाली,
सुभाष रोड, बीड - ४३१ १२२

रौप्य महोत्सवी वर्षात यशस्वी पदार्पण...
चंद्रप्रकाश सेठी
मो. 7588 85 85 85
9511 809 409